सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १५२ | रविवार, दि. २२ फेब्रुवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

# खडकेतील सख्या बहिणींचे 'एमपीएससी'त दमदार यश

## कृषी विभागातील क्लास वन-टू पदांवर निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील खडके येथील भावलाल चुडामण पाटील यांच्या नाती तसेच नाशिक विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी वसंत मथुराबाई भावलाल पाटील यांच्या दोन्ही मुलींनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षांतर्गत (एमपीएससी) क्लास वन आणि क्लास टू पदांसाठी यश मिळविले आहे. प्रांजल योजना वसंत पाटील यांची २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षेत कृषी उपसंचालक (क्लास १) पदावर निवड झाली आहे. तर त्यांची लहान बहीण मानसी योजना वसंत पाटील हीचीही महाराष्ट्र कृषी सेवा परीक्षा २०२४ मधून मंडळ कृषी अधिकारी (क्लास २) पदावर निवड झाली आहे. सामान्य शेतकरी कुटुंबातील या दोन्ही बहिणींनी कठोर परिश्रम, जिद्द आणि सातत्याच्या जोरावर मिळविलेल्या या यशाबद्दल खासदार स्मिताताई वाघ, आमदार अनिलदादा पाटील, अमोल पाटील यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. तसेच खडके येथील ग्रामस्थ, बोदर्डे-वंजारी ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व सदस्य, महाराणा प्रताप नगरमधील नागरिक, विविध संघटनांचे पदाधिकारी व पत्रकार बांधवांकडूनही त्यांचे कौतुक करण्यात येत आहे. दरम्यान, प्रांजल व मानसी या बहिणींनी मिळविलेले यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी व आदर्श निर्माण करणारे असून, स्पर्धा परीक्षांसाठी प्रयत्न करणाऱ्या युवक-युवतींना नवी दिशा देणारे आहे.





# डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर प्रवेशद्वार उभारणीला शासनाकडून मंजुरी

## आमदार अनिलदादा पाटील यांच्याकडून सातत्यपूर्ण पाठपुरावा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर भव्य प्रवेशद्वार उभारण्यास शासनाकडून मंजुरी मिळाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक परिषदेचे सर्व पदाधिकारी व समाजबांधव यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न आणि माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या प्रयत्नांमुळे ही मंजुरी मिळण्याचा मार्ग खुला झाला, अशी माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक परिषदेतर्फे देण्यात आली आहे.



यासंदर्भात अध्यक्ष नरेंद्र संदानशिव, ॲड. एस. एस. ब्रह्मे, प्रा. विजय तुंटे, प्रा. हर्षवर्धन जाधव, प्रा. विजय खैरनार, प्रा. राहुल निकम, प्रा. माधव भुसणार, प्रा. भानुदास गुलाले, प्रा. जितेंद्र संदानशिव, प्रा. विजय वाघमारे, प्रा. रवी बावस्कर, बौद्धचार्य बापूराव संदानशिव, बौद्धचार्य निकम, बौद्धचार्य अरुण घोलप, बौद्धचार्य डी. आर. सैंदाणे, बौद्धचार्य मैराळे, आयु. राजू भालेराव, अर्जुन कढरे, ॲड. प्रशांत संदानशिव, विजय संदानशिव, किरण संदानशिव, विनोद बिऱ्हाडे, ज्ञानेश्वर संदानशिव, संजय बिऱ्हाडे, गोकुळ बिऱ्हाडे, समाधान बिऱ्हाडे, गोपीचंद चव्हाण, भरत सोनवणे, सतीश सोनवणे, गौतम सोनवणे, मंगल सपकाळे, दिनेश बिऱ्हाडे, सुरेश वानखेडे, चंद्रकांत संदानशिव, भरत सरदार, सिद्धार्थ मोरे, अशोक महाजन-संदानशिव, प्रा. कृष्णा संदानशिव, आकाश संदानशिव, राजेंद्र संदानशिव, शांताराम संदानशिव, शुभम घोलप व इतर सर्व समाजबांधवांनी वर्षभरापूर्वी आमदार पाटील यांच्याकडे निवेदन दिले होते.

या मागणीचा आमदार पाटील यांच्याकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात आला. त्यानंतर २४ जुलै २०२४ रोजी शासनस्तरावर मंजुरी मिळून २९ डिसेंबर २०२५ रोजी प्रशासकीय मान्यताही मिळाली. या प्रकल्पासाठी ५० लाख रुपये मंजूर झाले आहेत. त्यामुळे लवकरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर भव्य प्रवेशद्वार प्रत्यक्षात उभारले जाणार आहे. हा निर्णय अमळनेर परिसरासह संपूर्ण समाजासाठी अभिमानास्पद ठरणारा आहे. या ऐतिहासिक यशामागे माजी नगरसेवक नरेंद्र संदानशिव यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचा मोठा वाटा असून, आमदार पाटील यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळे हे स्वप्न साकार झाले आहे. १८ फेब्रुवारी २०२५ रोजी हा निर्णय प्रत्यक्षात साकारण्याच्या दिशेने ठोस पाऊल टाकण्यात आले.

दरम्यान, हा निर्णय समाजाच्या भावनांचा आदर करणारा असून, सार्वजनिक वारसा जतन करण्याच्या दृष्टीने उचललेले सकारात्मक व दूरदृष्टीपूर्ण पाऊल असताना काही लोक गैरसमज निर्माण करून श्रेय घेण्याचा प्रयत्न करतात, ही खेदजनक बाब आहे. त्यामुळे खोट्या अपप्रचाराला थारा देऊ नये, असे आवाहन सामाजिक परिषदेतर्फे करण्यात आले आहे.

### पदोन्नतीसाठी 'टीईटी'ची अट; जि. प. शिक्षकांमध्ये खळबळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शिक्षण विभागातील पदोन्नती प्रक्रियेत महत्वपूर्ण बदल करत राज्यशासनाने शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण असणे बंधनकारक केले आहे. पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि विस्तार अधिकारी यापदांसाठी आता 'टीईटी' अत्यावश्यक अट राहणार आहे. यासंदर्भातील आदेश शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने निर्गमित केल्याची माहिती जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी दिली आहे. या आदेशामुळे राज्यभरातील जिल्हा परिषद शिक्षकांमध्ये खळबळ उडाली आहे.



*अमळनेर : पैलाड नाका ते स्मशानभूमीपुढील चोपडा रस्त्यावर काही दिवसांपूर्वी डंपर व दुचाकीचा अपघात घडला. त्यानंतर कशीतरी डांबर-खडी टाकून खड्डे बुजविण्याची तात्पुरती करण्यात आलेली मलमपट्टी.*

# चोपडा रस्त्यावरील खड्ड्यांची नुसतीच झाली मलमपट्टी!

## कायमस्वरूपी दर्जेदार पद्धतीच्या काँक्रीटीकरणाची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातून चोपड्याकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावरील पैलाड नाका ते स्मशानभूमीच्या पुढेपर्यंत खड्ड्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून, वाहनधारकांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याची तीव्र भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी पडलेले खोल खड्डे अपघातांना खुले आमंत्रण देत आहेत.

विशेष म्हणजे अपघात घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येते आणि फक्त कसेतरी डांबर-खडी टाकून खड्डे बुजविण्याची तात्पुरती मलमपट्टी केली जाते. त्यामुळे काही दिवसांतच ही मलमपट्टी उखडून जात पुन्हा पूर्वस्थिती निर्माण होते. त्यामुळे या रस्त्याचे संबंधित विभागाकडून कायमस्वरूपी दर्जेदार पद्धतीचे काँक्रीटीकरण व्हावे, अशी मागणी संतप्त वाहनधारक व परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

खड्ड्यांमुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात धूळ उडत असून, दुचाकीस्वारांच्या डोळ्यांत धूळ जाऊन अपघाताचा धोका वाढला आहे. अवजड वाहनांच्या वेगामुळे परिस्थिती अधिकच गंभीर होत आहे. काही दिवसांपूर्वी याच मार्गावर डंपरने दुचाकीस्वारास चिरडल्याची घटना घडली. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी तासभर रास्ता रोको आंदोलन करून प्रशासनाचे याकडे लक्ष वेधले होते. मात्र एवढा गंभीर अपघात होऊनही संबंधित ठिकाणचे खड्डे पाहिजे तसे बुजविण्यात आलेले नाहीत. तसेच अद्याप गतिरोधकही बसविण्यात आलेला नाही. त्यामुळे भविष्यात आणखी अपघात होण्याची भीती नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

# व्हॉल्वच्या खड्ड्यात पडल्याने शालेय विद्यार्थी गंभीर

## श्रीराम कॉलनीपुढील पटवारी कॉलनीतील फलकानजीक घडली घटना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील विविध भागांत नागरी सुविधांचा बोजवारा उडाल्याचे चित्र आहे. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. श्रीराम कॉलनीच्या पुढील पटवारी कॉलनीच्या फलकानजीक पाणीपुरवठ्याचा व्हॉल्व असलेल्या खड्ड्यात पडल्याने एका शालेय विद्यार्थ्याला गंभीर दुखापत झाल्याची घटना शनिवारी घडली. यात संबंधित विद्यार्थ्याच्या तोंडातून रक्त येऊ लागल्याने परिसरातील नागरिकांनी तत्काळ धाव घेत त्याला बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात पाठविले. स्थानिकांच्या मते संबंधित व्हॉल्वचा खड्डा अत्यंत खोल व उघड्या अवस्थेत असून, त्याभोवती कोणतीही सुरक्षा व्यवस्था नाही. त्यामुळे दररोज लहान-मोठे अपघात घडतच असतात. विशेषतः रात्री वाहनचालकांना हा खड्डा दिसत नसल्याने मोठ्या दुर्घटनेची शक्यता निर्माण झाली आहे. वारंवार तक्रारी करूनही पालिका प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नाही. एखाद्याचा जीव गेल्यावरच प्रशासन जागे होईल का? असा संतप्त प्रश्नही रहिवाशांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, प्रभाग क्र. १७ सह शहरातील अनेक भागांत गटारी तुंबल्याने दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. कॅरीबॅग व कचरा अडकल्यामुळे गटारींचे पाणी रस्त्यावर साचत असून रहिवाशांचे दैनंदिन जीवन विस्कळीत बनले आहे. या अस्वच्छतेचा सर्वाधिक फटका लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना बसत आहे. दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असून साथरोग पसरण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. पटवारी कॉलनीच्या फलकाजवळील संबंधित व्हॉल्वची प्रशासनाकडून तत्काळ दुरुस्ती करून सुरक्षिततेसाठी झाकण बसवावे तसेच तुंबलेल्या गटारींची स्वच्छता करून नियमित देखभाल केली जावी, अशी मागणी नागरिकांमधून जोर धरत आहे.



*अमळनेर : श्रीराम कॉलनीच्या पुढील पटवारी कॉलनीच्या फलकानजीक पाणीपुरवठ्याचा उघड्या स्थितीतील व्हॉल्व.*



*जखमी शालेय विद्यार्थी.*

# सरकारी अधिकाऱ्यांची तक्रार करणे झाले सोपे

## कार्यालयात कुलूपबंद अभिप्राय पेटी ठेवणे बंधनकारक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रत्येक शासकीय व निमशासकीय कार्यालयात प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक, लोककल्याणकारी व उत्तरदायित्व करण्याच्या दृष्टीने नागरिक अभिप्राय यंत्रणा प्रभावीपणे राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने आदेश जिल्हाधिकारी कार्यालयासह सर्वच विभागात धडकले आहेत. अर्थातच अभिप्राय पेटीच्या निर्णयामुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांना कार्यालयात कामासाठी आलेल्या अभ्यागतांना सन्मानाची वागणूक देण्यासह चोख कर्तव्य बजावे लागणार आहेत.

प्रत्येक शासकीय कार्यालयात नागरिकासाठी कुलूपबंद अभिप्राय पेटी ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. कार्यालयास भेट देणारे नागरिक तसेच अधिकारी, कर्मचारी, कार्यालयीन स्वच्छता, सेवा देण्याची पद्धत, वर्तणूक, कामकाजातील सुलभता

पान २ वर

# तरुणांमध्ये केस गळून टक्कल पडण्याचे प्रमाण लागले वाढीस

## लग्न जुळविताना ठरतोय मोठा अडथळा; तज्ज्ञांच्या मते बदलत्या जीवनशैलीचा परिणाम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अलीकडच्या काळात तरुणांमध्ये केस गळून टक्कल पडण्याचे प्रमाण झपाट्याने वाढीस लागत असल्याचे चित्र आहे. पूर्वी चाळीशीनंतर उत्पन्न होणारी ही समस्या आता महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपासून अगदी वयाच्या तिशीपूर्वीच तरुणांमध्ये निर्माण होताना दिसत आहे. बदलती जीवनशैली, ताणतणाव आणि अयोग्य आहार पद्धती आणि प्रदूषण यामुळे ही समस्या अधिक तीव्र होत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. डोक्यावरील केस कमी होत गेल्याने व्यक्तिमत्त्वावर परिणाम होतो, असा समज समाजात दृढ असल्याने तरुणांमध्ये न्यूनगंड वाढू लागला आहे. आनुवंशिकता हे प्रमुख कारण असले तरी अनियमित झोप, फास्ट फूडचे वाढते सेवन, प्रथिनांची कमतरता, सततचा मानसिक ताण, मोबाईल, लॅपटॉपसमोर तासन् तास बसणे, प्रदूषण आणि हार्मोन्समधील बदल यांसारखे घटक मोठ्या प्रमाणावर यासाठी जबाबदार ठरत असल्याचेही तज्ज्ञांकडून सांगितले जात आहे. त्यात ॲनिमिया, व्हिटॅमिन डी व बी-१२ ची कमतरता यामुळे केसगळती प्रामुख्याने वेगाने वाढते.

**लग्न जुळविताना निर्माण होणाऱ्या अडचणी**

लग्न जुळविताना मुलाचे शिक्षण, नोकरी, उत्पन्न यासोबतच बाह्यरूपालाही महत्त्व दिले जाते. काही ठिकाणी मुलाचे केस कमी असल्याचा मुद्दा थेट नकाराचे कारण ठरत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. केस कमी आहेत अशा टिप्पणींमुळे तरुणांचा आत्मविश्वास ढासळतो. परिणामी अनेक तरुण लग्नापूर्वीच केशरोपण करण्याचा निर्णय घेतात. समाजातील बाह्यरूपाला दिले जाणारे अतिमहत्त्व ही चिंतेची बाब बनली आहे.



**हास्य मजाक वाढता मानसिक ताण**

महाविद्यालय किंवा कार्यालयात केसगळती दिसू लागली, की मित्रांकडून टोपणनावे ठेवली जातात. सोशल मीडियावर मीम्स बनवून टिंगल-टवाळी केली जाते. सुरूवातीला हसून टाळणारे तरुण नंतर मानसिक तणाव अनुभवू लागतात. काही जण यामुळे सार्वजनिक कार्यक्रमांना जाणे टाळतात, टोपी किंवा कॅपचा वापर वाढवतात, फोटो काढताना मागे उभे राहतात. काही प्रकरणांत नैराश्याची लक्षणेही दिसून येतात.

**हजारो रुपये खर्च; तरीही हमी नाही**

केसगळती थांबविण्यासाठी बाजारातील विविध शाम्पू, सीरम, तेल, कंडिशनर, औषधी गोळ्या यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. दर महिन्याला हजारो रुपये खर्च होतात. काही जण आयुर्वेदिक, होमिओपॅथी तसेच घरगुती उपाय यांचा एकत्रित वापर करतात. मात्र मूळ कारण शोधले नाही तर अपेक्षित परिणाम मिळत नाही. त्यामुळे आर्थिक तोटा आणि मानसिक खिन्नता दोन्हीही वाढतात. सोशल मीडियावरील आकर्षक जाहिराती, १५ दिवसांत केस वाढवा अशा दाव्यांमुळे अनेक तरुणांची दिशाभूल होत आहे. तज्ज्ञांचा सल्ला न घेता औषधे किंवा उपचार सुरू केल्यास दुष्परिणाम होऊ शकतात. अपेक्षित परिणाम न मिळाल्यास शेवटी केशरोपण हा अंतिम पर्याय म्हणून निवडला जातो. मात्र तोही खर्चिक आणि सर्वांसाठी योग्य असेलच असे नाही.

**जागरूकतेची गरज**

तज्ज्ञांच्या मते संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, ताणतणाव नियंत्रण आणि आवश्यक तपासण्या केल्यास केसगळतीवर काही प्रमाणात नियंत्रण मिळवता येऊ शकते. तसेच बाह्यरूपापेक्षा व्यक्तिमत्त्व, कौशल्य आणि आत्मविश्वास यांना महत्त्व देण्याची समाजमानसिकता विकसित होणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे

## संपादकीय

# बाथरूममध्ये सारेच विनावस्त्राचे!

राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील कारकून राजेंद्र ढेरंगे याला ३५ हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केल्याची घटना वरकरणी किरकोळ वाटू शकते. परंतु तिचे परिणाम दूरगामी आहेत. कारण ही केवळ ३५ हजार रुपयांची लाच नसून, ती मंत्र्यांच्या दालनात घेतली गेली आहे, ही बाबच अधिक गंभीर आहे. भ्रष्टाचाराच्या अवाढव्य आकड्यांच्या बातम्यांना सरावलेल्या समाजाला ही रक्कम क्षुल्लक वाटू शकते; पण प्रश्न रकमेचा नसून व्यवस्थेच्या नैतिक अध:पतनाचा आहे. नेहमीप्रमाणे मंत्र्यांनी या प्रकाराशी आपला काहीही संबंध नसल्याचे सांगत हात झटकले आहेत. आपल्या समाजात जबाबदारी स्वीकारण्याची परंपरा फारशी दृढ नाही, याचे हे आणखी एक उदाहरण. सामान्य नागरिक सिग्नल पिवळा असताना पुढे गेला तरी त्याला नियमांची जाणीव करून दिली जाते. मात्र सत्तेच्या उंबरठ्यावर उभे असलेल्यांकडून अधिक परिपक्वतेची अपेक्षा असते. ती वारंवार फोल ठरते. अन्न व औषध प्रशासन हे खाते नागरिकांच्या आरोग्याशी थेट संबंधित आहे. आपण जे अन्न खातो, जी औषधे घेतो, त्यात भेसळ होऊ नये याची जबाबदारी या खात्यावर आहे. अशा खात्यातील कारकून लाच घेत असेल, तर त्या लाचेचे अंतिम ध्येय काय असू शकते, याचा विचारच भयावह आहे. भेसळीचा प्रश्न हा केवळ आर्थिक गुन्हा नसून तो मानवी जीवाशी खेळ करणारा अपराध आहे.

एकेकाळी समाजात अशा प्रवृत्तीविरुद्ध तीव्र चीड होती. राज कपूर यांनी 'जागते रहो' आणि 'श्री ४२०' या चित्रपटांतून भेसळ आणि भ्रष्टाचाराविरुद्ध ताशेरे ओढले होते. 'जागते रहो'मध्ये तर औषधातील भेसळीमुळे होणारे मृत्यू दाखवून समाजमन हादरवले होते. त्या काळी भेसळ नव्हती असे नाही; परंतु तिच्याविरोधात सामाजिक संताप होता. आज मात्र 'धूम'सारख्या चित्रपटांत चोरच नायक ठरतो, ही मानसिकतेतील बदलाची खूण आहे. लोकशाहीचे धडे आपण ज्या युनायटेड किंगडमकडून शिकलो, त्या देशातील अलीकडील घडामोडींची तुलना येथे आवश्यक ठरते. तेथे संशयाची सुई जरी फिरली तरी जबाबदारी स्वीकारावी लागते. ब्रिटनचे माजी मंत्री पीटर मॅन्डलसन यांना काही संशयांच्या पार्श्वभूमीवर हाऊस ऑफ लॉर्ड्समधून पायउतार व्हावे लागले. त्यांच्यावर प्रत्यक्ष गुन्ह्याचा ठपका नसतानाही सार्वजनिक जीवनातील नैतिकतेची पातळी टिकवण्यासाठी त्यांनी पदत्याग केला. तिथे जनतेच्या रोषाची भीती आहे; नैतिकतेची चाड आहे.

अलीकडेच हिथ्रो विमानतळ येथे एअर इंडियाच्या विमानाच्या तांत्रिक बिघाडाची घटना घडली. विमान सुखरूप मुंबईत पोहोचले, तरीही त्या घटनेची दखल घेत चौकशीची प्रक्रिया सुरू करण्यात आली. यावरून सुरक्षा आणि जबाबदारीबाबतची संवेदनशीलता दिसून येते. आपल्या देशात मात्र गंभीर अपघातांनंतरही चौकशी अहवाल धूळखात पडलेले दिसतात. या सर्व घटनांतून एकच गोष्ट स्पष्ट होते, की पाश्चिमात्य लोकशाही परिपूर्ण नाही; पण तेथील सार्वजनिक जीवनात नैतिकतेचे काही निकष अजून जीवंत आहेत. आपल्या येथे मात्र भ्रष्टाचार इतका सर्वव्यापी झाला आहे, की तो 'दिल्ली ते गल्ली' आणि 'मंत्री ते संतरी' सर्वत्र सहज स्वाभाविक वाटू लागला आहे. त्यामुळे मंत्र्यांच्या दालनातील कारकून लाच घेताना पकडला गेला, तरी जनतेची प्रतिक्रिया क्षीणच राहते. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात केवळ कारवाईपुरते समाधान मानू नये. मंत्रिमंडळाच्या प्रतिमेची आणि प्रशासनाच्या विश्वासार्हतेची चिंता असेल, तर संबंधित मंत्र्यांकडून नैतिक जबाबदारीची अपेक्षा ठेवली गेली पाहिजे. अन्यथा 'बाथरूममध्ये सारेच विनावस्त्राचे!' ही जनतेतील भावना अधिकच दृढ होईल. भ्रष्टाचाराची रक्कम लहान की मोठी, हा मुद्दा गौण आहे. महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सार्वजनिक जीवनातील जबाबदारी, पारदर्शकता आणि नैतिकता. ती जपली गेली नाही, तर लोकशाहीची केवळ रचना उरेल; आत्मा हरवेल. आणि एकदा आत्माच हरवला, की लोकशाही केवळ नावापुरती उरते.

## सरकारी अधिकाऱ्यांची तक्रार करणे झाले सोपे

पान १ वरून




किंवा विलंब याबाबत १ ते ५ गुणांमध्ये तसेच मुक्त स्वरूपात आपले अनुभव मांडू शकतील, यासाठी शासनाने विहित नमुन्यातील अभिप्राय प्रारूप उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत, तसेच अभिप्राय पेटी दरमहा ५ तारखेला कार्यालय प्रमुखांच्या उपस्थितीत उघडण्यात येणार असून प्राप्त झालेल्या सूचनांचे संकलन व परीक्षण योग्यरीत्या केले जाईल. कार्यालयाच्या स्तरावर तत्काळ अमलात आणता येणाऱ्या सूचनांची अंमलबजावणी करण्यात येईल, तर धोरणात्मक बदल असलेले, आवश्यक असलेले अभिप्राय वरिष्ठ स्तरावर पाठविले जातील. या उपक्रमामुळे शासकीय कामकाजात गतिमानता व पारदर्शकता वाढून शासन व नागरिकांमधील विश्वास दृढ होईल, असा शासनाचा विश्वास आहे. शासकीय कार्यालयास भेट देणाऱ्या अभ्यागतांना अभिप्रायासाठी फार्म ठेवण्याबाबत सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये व स्थानिक स्वराज्य संस्था यांना सूचना दिल्या आहेत. नागरिक असा नोंदवू शकतात, आपला अभिप्राय कार्यालयास भेट देणाऱ्या अभ्यागताबरोबरच त्या कार्यालयाच्या आस्थापनेतील अधिकारी व कर्मचारीसुद्धा शासन अधिकाअधिक लोकाभिमुख कसे होऊ शकेल, तसेच विकासात्मक व प्रशासकीय दृष्टीने शासकीय योजनामध्ये कोणते बदल काळानुरूप आवश्यक आहेत, याबाबत आपले अभिप्राय या यंत्रणेद्वारे देऊ शकतील.

**कर्मचाऱ्यांनमध्ये वाढणार धाकधूक**

शासनाने अभिप्राय पेटी बसविण्याचे आदेश काढल्याने कामचुकार व जनतेची कामे न करणाऱ्या कर्मचाऱ्यांची चांगलीच धाकधूक वाढली आहे. एकंदरीत आता कर्मचाऱ्यांना प्रशासनात चोख व अधिक कार्यक्षम राहावे लागणार आहेत, हेही आता तेवढेच खरे ठरणार आहे. शासनाच्या प्रत्येक योजना जनतेच्या हितासाठी असतात. त्या जनतेपर्यंत पोहोचविणे अधिकारी आणि कर्मचारी यांचे प्रशासकीय कर्तव्य असते. शासन व प्रशासकीय यंत्रणा यांच्यामध्ये सुवर्णमध्य साधण्यासाठी अभिप्राय पेटीच्या माध्यमातून महाराष्ट्रसरकारने जनतेला भेडसावणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी एक हक्काचे व्यासपीठ निर्माण करून दिले आहेत. त्यामुळे कर्मचारीसुद्धा जनतेच्या कामाला प्राधान्य देतील.

# उदयनगरला क्षुल्लक कारणातून राडा

## कार अडवून दगडफेक; २३ ग्रॅम सोन्याची चेन गहाळ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : रस्त्याने दुचाकी चालवताना मोबाईलवर बोलणाऱ्या तरुणाला 'गाडी नीट चालवा' असे सांगणे एका कारचालकासह तिन्ही तरुणांच्या अक्षरशः जीवावर बेतले. या क्षुल्लक कारणावरून चिडलेल्या तरुणाने आपल्या साथीदारांना बोलावून उदयनगर (डांगर) गावाजवळ रस्ता अडवला आणि कारवर जोरदार दगडफेक केली. या हल्ल्यात कारच्या काचा फुटून नुकसान झाले असून, फिर्यादीची २३ ग्रॅमची सोन्याची चेनही गहाळ झाली आहे. या प्रकरणी अमळनेर पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल झाला आहे.

**नेमकी घटना काय?**

या घटनेसंदर्भात दिलेल्या फिर्यादीनुसार तुषार लालचंद पवार (रा. शारदा कॉलनी, वड चौक) हे त्यांचे नातेवाईक निरंजन पवार आणि मकरंद पवार यांच्यासह मित्र दीप नागडा यास सोडण्यासाठी धुळ्याला गेले होते. दुपारी साडेतीनच्या सुमारास मित्राला सोडून ते टोयोटा हायरायडर कारने (एमएच ५४/बी ७००७) अमळनेरकडे परतत होते. कोंढावळ फाट्यावरून पुढे येत असताना एक २३ वर्षीय तरुण क्रमांक नसलेली दुचाकी मोबाईलवर बोलत चालवत होता. तो बोलण्याच्या नादात वारंवार थेट कारसमोर आडवा येत असल्याने चालक निरंजन पवार यांनी कार बाजूला थांबवून त्याला 'मोबाईलवर बोलू नका, गाडी नीट चालवा' अशी समज दिली. याचा राग आल्याने संबंधित तरुणाने कारचा फोटो काढून कोणाला तरी व्हॉट्सॲपवर पाठविला आणि 'तुम्ही पुढे चला, तुम्हाला दाखवतो' अशी धमकी देऊन तेथून निघून गेला. कार उदयनगरच्या बसस्थानकाजवळ आली असता तेथे एक लाल रंगाचे ट्रॅक्टर ट्रॉलीसह रस्त्याच्या मधोमध आडवे लावलेले दिसले. कार थांबवून रस्ता का बंद केला आहे, अशी विचारणा केली असता दुचाकीवरील तरुण तीन-चार साथीदारांसह तेथे हजर झाला. संबंधितांनी हातातील दगडांनी कारवर हल्ला चढवला. हल्ला सुरू असताना फिर्यादी तुषार पवार यांनी आपल्या मोबाईलमध्ये व्हिडिओ शूटिंग सुरू केले. हे पाहताच एका आरोपीने कारच्या खिडकीची काच फोडून तुषार यांच्या हातातील मोबाईलवर दगड मारला. ज्यामुळे मोबाईलचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. जीव वाचविण्यासाठी कारचालकाने कच्च्या रस्त्यावरून ती काढण्याचा प्रयत्न केला असता ट्रॅक्टरचालकाने तिला जोरात धडक देऊन कारचे नुकसान केले. या झटापटीत फिर्यादीच्या गळ्यातील २३ ग्रॅम सोन्याची चेन तुटून गहाळ झाली. दरम्यान, व्हिडिओच्या आधारे आणि चौकशीअंती संशयित आरोपींची नावे समोर आली आहेत. यात शुभम सुनील पाटील, मुकेश प्रकाश सोनवणे, सुनील धडकू पाटील आणि धीरज सुनील पाटील (सर्व रा. डांगर बुद्रुक, ता. अमळनेर) यांचा समावेश आहे. अमळनेर पोलिसांनी या घटनेचा गुन्हा दाखल केला आहे. हवालदार काशिनाथ नामदेव पाटील पुढील तपास करीत आहेत.

# हळदीत पुश-अपमध्ये नवऱ्याचा पराभव

## समस्त पुरुष मंडळी संताप करत म्हणाली, 'या पापी माणसाला...'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजकाल लग्नाची शैली लक्षणीयरीत्या बदलली आहे. लग्न फक्त विधी आणि परंपरांपुरते मर्यादित असायचे. पण आता त्यात मनोरंजन, मजा आणि नावीन्य असते. नृत्य, संगीत, खेळ आणि मजेदार स्पर्धा लग्नाचा एक सामान्य भाग बनल्या आहेत. विशेषतः हळदी, मेंदी आणि संगीतसारख्या कार्यक्रमांमध्ये लोक काहीतरी वेगळे आणि संस्मरणीय करण्याचा प्रयत्न करतात. ज्यामुळे लग्न कायमचे खास बनते. दरम्यान, सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल होत आहे ज्याने लोकांचे लक्ष वेधून घेतले आहे. या व्हिडिओमध्ये नाच किंवा संगीत नाही, तर लग्नाच्या वातावरणात फिटनेस चॅलेंज आहे. या अनोख्या दृश्याने लोकांना आश्चर्यचकित आणि आनंदित केले आहे.

### वधू आणि वर एकमेकांसमोर येतात

पुश-अपसाठी जमिनीवर एक चटई घातली जाते. वधू आणि वर एकमेकांकडे हसतात आणि स्पर्धेची तयारी करतात. सुरुवातीला, दोघेही चांगले प्रदर्शन करतात आणि तितकेच स्पर्धात्मक दिसतात. पुश-अपची संख्या वाढत असताना, वराची ताकद कमी होऊ लागते. तो सर्वतोपरी प्रयत्न करतो, परंतु सुमारे ३० नंतर, तो थकतो आणि थांबतो. दुसरीकडे वधू उत्साहात असल्याचे दिसून येते. ती न थांबता ३१ वा पुश-अप पूर्ण करते, अशा प्रकारे स्पर्धा जिंकते. वधूच्या विजयानंतर, गर्दी टाळ्यांचा कडकडाट करते आणि जयजयकार करते. वधूने स्पर्धा जिंकली असली तरी खरा विजय आनंद आणि मजेचा होता. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हास्य होते आणि हा क्षण लग्नाच्या आठवणींमध्ये कायमचा कोरला गेला.

**हळदी समारंभातील पुश-अप चॅलेंज**

व्हायरल व्हिडिओ हळदी समारंभातील असल्याचे म्हटले जाते. वातावरण आनंदाने भरलेले आहे, कुटुंब आणि नातेवाईक हसत आणि विनोद करत आहेत. दरम्यान, वर आणि वधूचे कुटुंब एक मजेदार कल्पना घेऊन येतात आणि फिटनेस स्पर्धा आयोजित करण्याचा निर्णय घेतात. संपूर्ण दृश्यात, वधू आणि वरांना पुश-अप करण्याचे आव्हान दिले जाते. गर्दी जल्लोष करते आणि टाळ्या वाजवते. ज्यामुळे वातावरण आणखी चैतन्यशील होते.

**सोशल मीडियावरील लोकांच्या मजेदार प्रतिक्रिया**

हा व्हिडिओ सोशल मीडिया प्लॅटफॉर्म X वर @MLA_jnm५०५० नावाच्या अकाउंटने शेअर केला आहे. हा व्हिडिओ लाखो लोकांनी पाहिला आहे आणि हजारो लोकांनी लाईक केला आहे. व्हिडिओवरील प्रतिक्रिया वेगवेगळ्या आहेत. एका वापरकर्त्याने लिहिले, 'आमच्या मुलीही कमी नाहीत.' दुसऱ्याने विनोदाने म्हटले, 'भविष्यात लग्नांमध्ये अशा स्पर्धा सामान्य होतील.' दुसऱ्याने विनोदाने लिहिले, 'या स्पर्धेनंतर पुरुष समुदायात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.'

# श्रीलंकेत माजी अध्यक्ष आणि खासदारांचे पेन्शन रद्द

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्रीलंकेच्या पार्लमेंट सदस्यांनी १७ फेब्रुवारी २०२६ रोजी इतिहास घडवला. सरकारने निवडणूकपूर्व प्रचाराचे एक महत्त्वाचे आश्वासन पूर्ण करण्यासाठी, संसदेच्या सर्व माजी सदस्यांचे पेन्शन रद्द करण्यासाठी एक बील संसदेत मांडले होते. मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी रोजी संसदेत त्यावर मतदान झाले. सदस्यांनी प्रचंड मताधिक्याने हे बिल मंजूर केले. २२५ सदस्यांच्या सभागृहात १५४ मतांनी ४९ वर्षे जुना संसदीय पेन्शन कायदा रद्द करण्याचे विधेयक मंजूर केले गेले. फक्त दोन सदस्यांनी विरोधात मत दिले. बाकी सदस्य गैरहजर होते. देशाच्या आर्थिक संकटावर जनतेचा रोष असल्याने हे पाऊल उचलण्यात आले. श्रीलंकेत, पाच वर्षे संसद सदस्य म्हणून राहिल्यानंतर,आणि त्याच्या किंवा तिच्या मृत्यूनंतर त्यांच्या विधवेला/विधुराला पेन्शन मिळण्याचा अधिकार होता. नवीन कायद्यामुळे असे सर्व पेमेंट आणि पेन्शन बंद झाले आहे. २०२४ मध्ये झालेल्या निवडणुकीत सत्तेत आलेले राष्ट्रपती अनुरा कुमार दिसानायके यांनी त्यांच्या निवडणूक प्रचारादरम्यान ही प्रथा बंद करण्याचे वचन दिले होते. यापूर्वी दिसानायके यांच्या सरकारने सप्टेंबर २०२५ मध्ये लोकांच्या मागणीला प्रतिसाद म्हणून माजी राष्ट्रपतींना देण्यात येणारे भत्ते रद्द केले होते. त्यामध्ये माजी राष्ट्रपती आणि त्यांच्या विधवांसाठी घरे, भत्ते, पेन्शन, सरकारी निधी असलेल्या इंधनासह लक्झरी वाहने, अंगरक्षक, कार्यालय आणि कर्मचारी यांचा समावेश होता. हे सर्व आता रद्द करण्यात आले आहे. सध्या पाच माजी राष्ट्रपती आणि एक विधवा या सोयी सुविधा उपभोगत होते. न्यायमंत्री हर्षणा नानयक्कारा यांनी संसदेत पेन्शन रद्द करण्याचे विधेयक सादर केले आणि त्यावेळी म्हटले की निवडणुकीतील आश्वासन आता पूर्ण झाले आहे आणि देश सर्वात वाईट आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी संघर्ष करत असताना कायदेकर्त्यांना पेन्शन मिळण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही. त्यांनी पुढे जे सांगितले ते अतिशय विचार करायला लावणारे आणि धाडसी होते. ते म्हणाले, "जेव्हा लोक या सभागृहातल्या चर्चेचा दर्जा आणि सदस्य संसदेत काय बोलतात पाहतात तेव्हा त्यांना संसद सदस्य पेन्शन मिळण्यास पात्र वाटत नाहीत." पेन्शन रद्द करण्याच्या विधेयकाला विरोध करणारे विरोधी पक्षनेते साजित प्रेमदासा यांची प्रतिक्रिया अत्यंत अनाकलनीय होती. त्यांनी आक्षेप घेतला आणि म्हटले, की पद सोडल्यानंतर आमदारांना सामाजिक सुरक्षा मिळावी यासाठी पेन्शन आवश्यक आहे. अन्यथा निवृत्तीनंतर स्वतःचे भविष्य सुनिश्चित करण्यासाठी भ्रष्टाचाराद्वारे संपत्ती जमवण्याचा मोह त्यांना होऊ शकतो. अशा प्रकारे सर्व माजी अध्यक्ष, खासदार यांना मिळणारे पेन्शन आणि सुविधा श्रीलंकेत बंद झाल्या आहेत.



# इम्रान खान यांच्यासाठी कपिल देव, सुनील गावस्करसह जगातील १४ क्रिकेटपटू एकवटले, पाकिस्तान सरकारला पाठवले पत्र

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान तथा क्रिकेट संघाचे माजी कर्णधार इम्रान खान यांच्यासाठी जगभरातील दिग्गज क्रिकेटपटू एकवटले आहेत. त्यांनी एकत्र येत पाकिस्तान सरकारला पत्र लिहिले आहे. पाकिस्तानचे माजी पंतप्रधान तथा माजी क्रिकेटपटू इम्रान खान यांच्या डोळ्याला दुखापत झाल्याचे वृत्त समोर आले आहे. त्यांच्या उजव्या बाजूच्या डोळ्याची ८५ टक्के दृष्टी गेल्याची माहिती आहे. इम्रान खान यांच्या आरोग्याबाबत सातत्याने वेगवेगळ्या बातम्या समोर येत आहेत. यामुळे इम्रान खान यांच्यासाठी आता जगभरातील दिग्गज क्रिकेटपटू एकवटताना दिसत आहेत. या क्रिकेटपटूंनी इम्रान खान यांच्या आरोग्यावर चिंता व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार कपिल देव आणि सुनील गावस्कर यांचादेखील यामध्ये समावेश आहे. कपिल देव आणि गावस्कर यांच्यासह जगभरातील विविध क्रिकेट संघाच्या १४ दिग्गज माजी कर्णधारांनी पाकिस्तान सरकारला पत्र लिहून इम्रान खान यांच्यासोबत माणूस म्हणून चांगली वागणूक देण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या आरोग्याची योग्य काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पाकिस्तान सरकारला पाठविलेल्या पत्रावर कपिल देव आणि सुनील गावस्कर यांच्यासह मायकल एथरटन, नासिर हुसैन, क्लाइव्ह लॉयड, स्टीव वॉ, एलन बॉर्डर, मायकल ब्रेयरली, ग्रेग चॅपल, इयान चॅपल, बेलिंडा क्लार्क, डेव्हिड गावर, किम ह्यूज आणि जॉन राइट यांचीदेखील स्वाक्षरी आहे. 'माजी आंतरराष्ट्रीय क्रिकेट कर्णधारांची विनंती', असा विषय या पत्रात लिहिण्यात आला आहे.

**दिग्गज क्रिकेटपटूंनी पत्रात काय म्हटले?**

"आम्ही आमच्या राष्ट्रीय क्रिकेट संघाचे कर्णधार, पाकिस्तानचे माजी कर्णधार आणि विश्व क्रिकेटचे दिग्गज इम्रान खान यांच्यासोबतच्या कथित गैरव्यवहार आणि कारावाबाबात गंभीर चिंता व्यक्त करत पत्र लिहीत आहोत. नुकत्याच समोर आलेल्या रिपोर्टनुसार त्यांचे आरोग्य खालावल्याची माहिती आहे. त्यामुळे गेल्या दीड वर्षापासून कैदेत असल्यापासूनच्या त्यांच्या अवस्थेबाबत आम्हाला खूप चिंतेत टाकले आहे", असे पत्रात म्हटले आहे.

# बसच्या फुटलेल्या काचा, वाढत्या धुळीमुळे प्रवाशांना त्रास

## राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या अक्षम्य दुर्लक्षाचा परिणाम?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील डेपोसह राज्यातील विविध मार्गांवर धावणाऱ्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसची दुरवस्था पुन्हा एकदा समोर आली आहे. अनेक बसच्या काचा फुटलेल्या किंवा तडकलेल्या अवस्थेत असून, काही ठिकाणी खिडक्यांना काचाच नसल्याने प्रवाशांना प्रचंड धूळ, वारा आणि उष्णतेचा सामना करावा लागत आहे. या प्रकारामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा आणि आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

फुटलेल्या काचांमुळे अपघाताचा धोका प्रवाशांच्या म्हणण्यानुसार ग्रामीण आणि महामार्गावरील मार्गांवर धावणाऱ्या अनेक बसच्या खिडक्यांच्या काचा तडकलेल्या अवस्थेत आहेत. काही बसमध्ये तात्पुरत्या स्वरूपात प्लास्टिक शीट लावून काम भागवले जात आहे. वेगात धावत असताना काच पूर्णपणे फुटल्यास प्रवासी जखमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः लांब पल्ल्याच्या प्रवासात रात्रीच्या वेळी थंड वारा आणि धूळ यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना त्रास सहन करावा लागतो. काही प्रवाशांच्या डोळ्यांत जळजळ, श्वसनाचा त्रास आणि ॲलर्जी वाढल्याच्याही तक्रारी आहेत.

वाढत्या धुळीचा आरोग्यावर परिणाम अनेक ग्रामीण मार्गांवरील रस्त्यांची स्थिती ठीक नसल्याने वातावरणात धुळीचे प्रमाण वाढले आहे. बसच्या काचा व्यवस्थित नसल्यामुळे ही धूळ थेट बसमध्ये येते. परिणामी प्रवाशांना तोंडाला रुमाल लावून प्रवास करावा लागत आहे. काही ठिकाणी बसच्या आतील आसनांवर धुळीची थर साचलेले दिसून येतात.

आरोग्यतज्ज्ञांच्या मते सतत धुळीत प्रवास केल्यास दमा, ॲलर्जी आणि श्वसनाचे विकार बळावू शकतात. विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांसाठी ही परिस्थिती धोकादायक ठरू शकते.

**कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष?**

प्रवाशांचा आरोप आहे, की डेपो स्तरावर बसची नियमित तपासणी होत नाही. किरकोळ बिघाडांकडे दुर्लक्ष केले जाते आणि बस तात्पुरत्या दुरुस्तीसह रस्त्यावर सोडल्या जातात. काही चालक-वाहकांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले, की वरिष्ठ पातळीवरून सुटे भाग उपलब्ध होत नाहीत, बस धुण्याकडे कर्मचाऱ्यांचे हेतुपुरस्सर दुर्लक्ष केले जाते, निधीचाही अभाव जाणवतो. त्यामुळे दुरुस्ती रखडते. मात्र महामंडळाकडून बसची नियमित तपासणी केली जाते. ज्या बसमध्ये गंभीर दोष आढळतात त्या तातडीने कार्यशाळेत पाठविल्या जातात. मात्र, प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी असल्याचा आरोप प्रवाशांकडून होत आहे.




### आर्थिक अडचणींचा परिणाम?

'कोविड'च्या काळानंतर महामंडळाला आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. विविध योजनांमुळे उत्पन्न घटल्याने देखभाल आणि दुरुस्तीसाठी लागणारा खर्च मर्यादित झाला असल्याचेही कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे. परिणामी जुन्या बसची संख्या वाढत असून, त्यांची दुरवस्था प्रकर्षाने जाणवत आहे. दरम्यान, सर्व बसची तातडीने तपासणी करून फुटलेल्या काचा बदलाव्यात, बस स्वच्छतेची नियमित अंमलबजावणी केली जावी, त्यासाठी डेपो स्तरावर जबाबदारी निश्चित करायला हवी, तक्रार नोंदविण्यासाठी प्रभावी यंत्रणा सुरू करावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

### प्रशासनाने ठोस भूमिका घ्यावी

राज्य परिवनह महामंडळाची बस ही ग्रामीण भागातील सर्वसामान्यांची जीवनवाहिनी मानली जाते. विद्यार्थ्यांपासून कामगारांपर्यंत लाखो प्रवासी दररोज या सेवेवर अवलंबून आहेत. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेशी तडजोड करणे परवडणारे नाही. एसटी प्रशासनाने तातडीने सर्व डेपोंना सूचना देऊन बस दुरुस्ती आणि देखभाल मोहीम हाती घ्यावी, अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे. अन्यथा प्रवाशांच्या रोषाला सामोरे जावे लागेल, अशीही प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# अपयशाने खचले नाही... यश त्यांच्या कष्टासमोर थांबले नाही!



सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बिहारमधील ग्रामीण भागातून आलेल्या अविनाश यांनी अभियांत्रिकी पूर्ण करून नोकरी केली, मात्र आयएएसचे स्वप्न उराशी बाळगले. दरवर्षी लाखो तरुण यूपीएससी परीक्षेची तयारी करतात. ग्रामीण भागातील हजारो तरुण आयएएस किंवा आयपीएस अधिकारी होण्याचे स्वप्न पाहतात. शेतकरी कुटुंबातील एक मुलगा आयएएस अधिकारी झाल्यावर तो ग्रामीण भागातील हजारो तरुणांसाठी प्रेरणास्त्रोत ठरतो. २०२३ च्या परीक्षेत यश मिळवलेले आयएएस अधिकारी अविनाश कुमार आज अशाच तरुणांसाठी आदर्श ठरत आहेत. बिहारमधील फोक्सगंजमधील बाबू गावातून देशातील सर्वोच्च प्रशासकीय सेवेत पोहोचलेला हा प्रवास सोपा नव्हता. अविनाश यांनी सुरुवातीचे शिक्षण सरस्वती विद्या मंदिर येथे घेतले. शालेय शिक्षणानंतर त्यांनी बोकारो येथून इंटरमिजिएट पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी दहावीमध्ये ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवले. इंटरमिजिएट पूर्ण केल्यानंतर अविनाश यांनी कोलकात्यातील जाधवपूर विद्यापीठातून अभियांत्रिकीची पदवी मिळविली.


### अभियांत्रिकीनंतर केली नोकरी

पदवीनंतर अविनाश यांनी बंगळुरूमध्ये एका पॉवर प्रोजेक्टवर ११ महिने काम केले. नोकरीदरम्यानच त्यांना यूपीएससीची आवड निर्माण झाली. त्यानंतर त्यांनी आयएएस अधिकारी होण्याचे स्वप्न पाहिले आणि तयारीसाठी नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. मात्र, हा प्रवास सोपा नव्हता. पहिल्या दोन प्रयत्नांत त्यांना अपयश आले. तरीही त्यांनी हार मानली नाही. दररोज तासन्तास अभ्यास करत ते यूपीएससीसाठी पूर्णपणे समर्पित राहिले. शेवटी २०२३ मध्ये त्यांनी यूपीएससी परीक्षेत प्रिलिम्स, मेन्स आणि मुलाखत हे सर्व टप्पे यशस्वीरीत्या पूर्ण केले. अविनाश यांना संपूर्ण भारतात २७ वा क्रमांक मिळाला आणि त्यांचे आयएएस अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण झाले.

### स्वअभ्यासालाच तुमचे शस्त्र बनवा

यशाबाबत बोलताना अविनाश सांगतात, की सरूवातीला त्यांनी कोचिंग घेतले. मात्र त्यानंतर स्वतःचा अभ्यास हाच त्यांचा सर्वात मोठा आधार ठरला. सखोल व सातत्यपूर्ण अभ्यास केल्यास यूपीएससीसारखी कठीण परीक्षा देखील उत्तीर्ण होऊ शकते, असा त्यांचा विश्वास आहे. यूपीएससी इच्छुकांनी गांभीर्याने आणि नियोजनबद्ध अभ्यास करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. अपयशाने खचून न जाता सातत्य ठेवले, तर यश नक्कीच मिळते, हे अविनाश कुमार यांच्या प्रवासातून स्पष्ट होते.

# शिवनेरीचा सूर्य आता 'ग्लोबल' झालाय!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जुन्नरच्या शिवनेरी किल्ल्यावर पहाटे पाचची वेळ. सह्याद्रीच्या कडांमधून वारा सुसाट सुटलाय आणि खालच्या जुन्नर शहरातून तुतारीची ललकारी ऐकू येतेय. १९ फेब्रुवारी १६३० ला याच वातावरणात एका युगाचा प्रारंभ झाला होता. आज ३९६ वर्षांनंतरही तोच उत्साह आहे, पण एका नव्या जागतिक अभिमानासह.

वस्तुस्थिती अशी आहे, की शिवजयंती केवळ महाराष्ट्रासाठी नाही, तर जगासाठी खास आहे. नुकतेच युनेस्कोने 'मराठा मिलिटरी लँडस्केप'ला जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिला आहे. रायगड, शिवनेरी आणि सिंधुदुर्गसह १२ किल्ल्यांना आता जागतिक नकाशावर अधिकृत स्थान मिळाले आहे. हा तर छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धनीतीचा आणि स्थापत्यशास्त्राचा जागतिक स्वीकार आहे.

महाराजांचे विचार आता 'आउटडेटेड' राहिलेले नाहीत. महाराजांची प्रतिमा आजही देशाला दिशा देत आहे. जुन्नरमध्ये सुरू असलेला तीन दिवसांचा 'हिंदवी स्वराज्य महोत्सव' हे याचेच जीवंत उदाहरण आहे.

आकडेवारी सांगते, की यंदा शिवजयंतीमध्ये एक मोठा बदल जाणवतोय. छत्रपती संभाजीनगरसारख्या शहरात डीजे आणि लेझर लाईट्सला फाटा देऊन पारंपारिक ढोल-ताशा आणि शिवचरित्र पारायणावर भर दिला जातोय. तरुणाई आता केवळ नाचण्यासाठी नाही, तर महाराजांचे 'मॅनेजमेंट' शिकण्यासाठी एकत्र येतेय.

महाराजांनी शून्यातून स्वराज्य निर्माण केले. आजच्या स्टार्टअप युगात त्यांचा 'गनिमी कावा' आणि 'प्रशासकीय शिस्त' हे कोणत्याही एमबीए पदवीपेक्षा मोठे धडे आहेत. त्यांनी केवळ किल्ले जिंकले नाहीत, तर माणसांची मने जिंकली. स्वराज्य ही केवळ एक भौगोलिक सीमा नव्हती, तर तो एक विचार होतान्यायाचा, समतेचा आणि स्वाभिमानाचा.

शिवजयंती साजरी करणे म्हणजे केवळ मिरवणूक काढणे नव्हे. शिवजयंती म्हणजे स्वतःच्या कर्तृत्वाचा गड चढण्याची जिद्द निर्माण करणे. हा वारसा आता जागतिक झाला आहे, तो जपणे आणि पुढे नेणे हीच खरी मानवंदना ठरेल. छत्रपती शिवाजी महाराजांची कारकिर्द हे केवळ इतिहासाचे पान नाही, तर भविष्याचा पाया आहे.

# गोव्याच्या 'शांतादुर्गे'चा अद्भुत इतिहास आणि न ऐकलेली रहस्ये!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गोवा म्हणजे केवळ निळाशार समुद्र, पांढरी वाळू आणि पर्यटकांची मौज-मजा करण्याचे ठिकाण आहे, असा एक अत्यंत मर्यादित दृष्टिकोन आजकाल जनमानसात रूढ झाला आहे, परंतु या आधुनिक रूपाच्या मागे हजारो वर्षांचा वैभवशाली इतिहास, अथांग अध्यात्म आणि पौराणिक कथांची एक समृद्ध परंपरा दडलेली आहे. परशुराम भूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या प्रांताला समुद्र देवतेची विशेष कृपा लाभली असून, येथील निसर्गसौंदर्य हे केवळ डोळ्यांना सुख देणारे नसून ते मनाला शांती देणारे एक आध्यात्मिक ऊर्जा केंद्र आहे. सह्याद्रीच्या कुशीत वसलेला हा प्रदेश प्राचीन काळापासून 'गोमंतक' किंवा 'गोपराष्ट्र' म्हणून ओळखला जातो, ज्याचा उल्लेख महाभारतासारख्या महान ग्रंथातही आढळतो.

पौराणिक संदर्भांनुसार गोव्याची निर्मिती भगवान विष्णूंचे सहावे अवतार महर्षी परशुराम यांच्या पराक्रमाशी जोडलेली आहे. जेव्हा परशुरामांनी पृथ्वी निःक्षत्रिय केली आणि सर्व भूमी ऋषी कश्यपांना दान केली, तेव्हा स्वतःच्या निवासासाठी त्यांनी सह्याद्रीच्या शिखरावरून बाण सोडून अथांग समुद्राला मागे हटवले आणि जी भूमी प्रकट झाली ती म्हणजे 'कोंकण' आणि त्याचाच एक अत्यंत पवित्र भाग म्हणजे आजचा 'गोवा'. या भूमीला 'गोमांचल', 'गोपुरी' आणि 'गोमंतक' अशा नावांनी संबोधले गेले असून स्कंद पुराणातील सह्याद्री खंडात या भूमीच्या धार्मिक महत्त्वाचे सविस्तर वर्णन येते. गोव्याच्या याच पवित्र भूमीमध्ये कवळे येथे श्री शांतादुर्गा देवीचे भव्य मंदिर वसलेले आहे, ज्याचा इतिहास संघर्षातून श्रद्धेकडे नेणारा आहे. मूळतः हे मंदिर साष्टी तालुक्यातील केळोशी येथे होते, परंतु सोळाव्या शतकात पोर्तुगीज राजवटीच्या काळात जेव्हा हिंदू संस्कृतीवर आघात होत होते, तेव्हा एका काळरात्री स्थानिक भक्तांनी जीवावर उदार होऊन देवीची मूर्ती एका कापडात गुंडाळून नदीमार्गे गुप्तपणे कवळे येथे हलवली. शांतादुर्गा हे रूप देवीच्या इतर उग्र रूपांपेक्षा पूर्णपणे वेगळे आणि शांत आहे.

पौराणिक कथेनुसार एकदा भगवान शिव आणि भगवान विष्णू यांच्यात श्रेष्ठतेवरून भीषण युद्ध पेटले होते. ज्यामुळे विश्वाचे अस्तित्व धोक्यात आले होते. हे युद्ध थांबवण्यासाठी ब्रह्मदेवाने आदिशक्तीला विनंती केली आणि तेव्हा देवीने एका हातात विष्णूचा व दुसऱ्या हातात शिवाचा हात धरून दोघांमधील क्रोध शांत केला, म्हणूनच या रूपाला 'शांतादुर्गा' असे संबोधले जाते. मंदिराच्या गाभाऱ्यात असलेली मुख्य मूर्ती ही पाषाणाची नसून ती अत्यंत दुर्मिळ अशा 'पंचधातूंची' बनलेली आहे, जी चकाकणाऱ्या सुवर्णकांतीप्रमाणे भासते. या मूर्तीचे सर्वात मोठे अद्भुत वैशिष्ट्य म्हणजे देवीचे शांत स्मितहास्य आणि तिने आपल्या दोन्ही हातांनी भगवान शिव आणि भगवान विष्णू यांना धरून ठेवलेले स्वरूप, जे जगात अन्यत्र कुठेही पाहायला मिळत नाही. उत्सव काळात जेव्हा देवीला विविध अलंकारांनी आणि रत्नांनी मढवलेल्या सुवर्ण मुखवट्याने सजवले जाते, तेव्हा तिचे रूप इतके सतेज दिसते की जणू प्रत्यक्ष आदिशक्ती तिथे प्रकट झाली आहे असे वाटते. या मंदिराचे सध्याचे स्वरूप १८ व्या शतकात मराठा साम्राज्याचे छत्रपती शाहू महाराज यांचे मंत्री नरराम मंत्री यांनी अत्यंत भव्यदिव्य रीतीने उभारले आहे.

येथील उत्सवांमध्ये माघ शुद्ध पंचमीचा जत्रोत्सव अत्यंत महत्त्वाचा असतो. ज्यामध्ये 'पाळणा उत्सव' हे विशेष आकर्षण असते. या उत्सवात देवीला अत्यंत सुंदर रीतीने सजवलेल्या पाळण्यात बसवले जाते. ही परंपरा वात्सल्य आणि अपार श्रद्धेचे प्रतीक मानली जाते, जिथे भक्तीच्या रसात न्हाऊन निघालेले भक्तगण देवीला एखाद्या लहान बाळाप्रमाणे लाड करत पाळण्यात झुलवतात. लोकपरंपरेनुसार पोर्तुगीज काळात मूर्ती वाचवण्यासाठी ती हलवत असताना देवीने स्वतः भक्तांना स्वप्नात दृष्टांत देऊन मार्ग दाखवला होता, अशीही धारणा आहे. गोव्यातील या मंदिरांमध्ये 'कौल' लावण्याची अनोखी परंपरा आजही जीवंत आहे, जिथे कोणत्याही शुभ कार्यापूर्वी देवीची आज्ञा फुलांच्या माध्यमातून घेतली जाते. इंडो-पोर्तुगीज स्थापत्यशैलीचा संगम असलेल्या या मंदिरात जेव्हा रात्रीच्या वेळी उंच दीपस्तंभ हजारो दिव्यांनी उजळून निघतो आणि देवीची सुवर्णकांती त्या प्रकाशात झळाळते, तेव्हा तो नजारा केवळ डोळ्यांचे पारणे फेडणारा नसून आत्मिक सुख देणारा असतो. येथील अष्टकोनी घुमट आजही वास्तुशास्त्राचा चमत्कार मानले जातात. कारण ते कोणत्याही आधुनिक यंत्रणांशिवाय नैसर्गिकरीत्या थंड राहतात. देवीच्या मुखावरील तेज आणि तिची अभय मुद्रा पाहताच भक्तांच्या मनातील सर्व चिंता दूर होतात. गोवा म्हणजे केवळ पर्यटनाचे केंद्र नाही, तर ती एक सिद्ध भूमी आहे, जिथे निसर्ग, समुद्र देवतेचा नाद आणि शांतादुर्गेची भक्ती यांचा अद्भुत संगम पाहायला मिळतो.



# चांदी में निवेश का सही फॉर्मूला क्या?

## सिक्का, ज्वैलरी, बिस्किट या बर्तन जानें किसमें है सबसे ज्यादा फायदा?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चांदी की कीमतों में हाल के उतार-चढ़ाव के बीच, बड़ा सवाल यह है कि आपको चांदी में किस तरह से इन्वेस्ट करना चाहिए? सिक्के, बिस्किट, ज्वेलरी या बर्तन? हाल के दिनों में चांदी की कीमतों में तेजी से बढ़ोतरी हुई है। कई इन्वेस्टर इस मौके का फायदा उठाकर खरीदने के लिए बेताब हैं। हालांकि, हर तरह से चांदी खरीदना फायदेमंद नहीं है।

चांदी की कीमतों में हाल के उतार-चढ़ाव के बीच, बड़ा सवाल यह है कि आपको चांदी में किस तरह से इन्वेस्ट करना चाहिए? सिक्के, बिस्किट, ज्वेलरी या बर्तन? एक्सपर्ट्स का कहना है कि सही ऑप्शन चुनना ही असली फायदे की चाबी है।

### १) सिक्के और बिस्किट (चांदी के)

प्योर इन्वेस्टमेंट के नजरिए से, सिक्के और बिस्किट सबसे अच्छे माने जाते हैं। इनकी प्योरिटी ९९.९% तक हो सकती है. इनमें बहुत कम या कोई मैन्युफैक्चरिंग चार्ज नहीं लगता है। हालांकि, आमतौर पर १-३% का मैन्युफैक्चरिंग चार्ज लगता है। सेल पर डिस्काउंट भी बहुत कम होता है।



### टैक्स गणना :

खरीदने पर आपको ३% जीएसटी देना होगा। अगर आप तीन साल के अंदर बेचते हैं, तो आपको शॉर्ट-टर्म कैपिटल गेन टैक्स (आपके इनकम टैक्स स्लैब के अनुसार) देना पड़ सकता है। अगर आप तीन साल बाद बेचते हैं, तो आपको २०% (इंडेक्सेशन के साथ) लॉन्ग-टर्म कैपिटल गेन टैक्स देना पड़ सकता है।

उदाहरण के लिए, अगर आप १ लाख रुपये (जीएसटी मिलाकर १,०३,००० रुपये) की चांदी खरीदते हैं और तीन साल बाद उसे १.५० लाख रुपये में बेचते हैं, तो प्रॉफिट पर २०% (इंडेक्सेशन के बाद) टैक्स लगेगा.

### २) सिल्वर ज्वेलरी

ज्वेलरी आकर्षक होती है, लेकिन इन्वेस्टमेंट के तौर पर कम फायदेमंद होती है। मेकिंग चार्ज ८% से २०% तक होता है बेचने पर ये चार्ज वापस नहीं किए जाते.

और प्योरिटी अक्सर ९२.५% (स्टर्लिंग सिल्वर) जितनी ज़्यादा होती है. सिल्वर के सिक्कों और बार की तरह, इस पर भी ३% जीएसटी लगता है, लेकिन बेचने पर अक्सर ५-१०% का डिस्काउंट मिल सकता है। इसका मतलब है कम प्रॉफिट।

### ३) बर्तन ( चांदी के )

चांदी के बर्तनों का मेकिंग चार्ज ज्वेलरी के मुकाबले कम होता है, लेकिन सिक्कों के मुकाबले ज़्यादा होता है। प्योरिटी अलग-अलग हो सकती है. रीसेल वैल्यू स्टोर पर निर्भर करती है। टैक्स के नियम ज्वेलरी जैसे ही हैं, जिसमें खरीदने पर ३% जीएसटी और बेचने पर कैपिटल गेन टैक्स लगता है।

### टैक्स कहां नहीं लगता?

अगर आप चांदी गिफ्ट करते हैं, तो न तो खरीदने वाले पर और न ही पाने वाले पर जीएसटी लगता है (खरीद पर टैक्स लगता है), लेकिन परिवार के सदस्यों को दिए गए गिफ्ट पर इनकम टैक्स नहीं लगता.

### कौन सा तरीका सही है?

सिर्फ इन्वेस्टमेंट के लिए : सिक्के और बिस्कुट सबसे अच्छे हैं।

इस्तेमाल + इन्वेस्टमेंट : बर्तन

सिर्फ फैशन : ज्वेलरी

चांदी की तेजी के इस समय में, खरीदने से पहले मेकिंग चार्ज, प्योरिटी और टैक्स को समझना जरूरी है। सही तरीका चुनने से यह पक्का होगा कि आपको तेज़ी का पूरा फ़ायदा मिले, नहीं तो मेकिंग चार्ज और टैक्स आपके मुनाफ़े को खत्म कर सकते हैं।

## अशी कुठली अधिकृत कायदेशीर वेबसाईट आहे का? की ज्यावर शहिदांच्या कुटुंबीयांची माहिती मिळते?

कधी शहीद झाले? कुठे शहीद झाले? किती जण कुटुंबात आहेत? शहीद झाल्यावर मदत किती मिळाली? मुले कुठे शिकत आहेत? पत्नी नोकरीच्या शोधात आहे का? पेन्शन चालू झाले का? निवारा आहे का? वैद्यकीय काय मदत आहे? आणि.. सध्या काय कमी पडते? कालपासून एकच मनात आहे. ते प्रतिहल्ला.. बदला... वगैरे आपले काम नाही. पुढे काय डिसीजन घ्यायचे हे ठरवायला देशाची व्यवस्था सक्षम आहे. मग कोणाचेही सरकार असो. फक्त या शहिदांच्या कुटुंबीयांची... नंतर काय अवस्था आहे. २ वर्षांनी, ५ वर्षांनी, २० वर्षांनी हे जाणून घेणे महत्त्वाचे वाटते आहे आणि यासाठी एक कॉमन माहितीचा स्त्रोत आहे का? कारण आमचे शहिदांविषयीचे प्रेम त्या दिवशी आक्रमक असते व नंतर त्या कुटुंबाला विसरून जातो. जर असा कॉमन प्लॅटफॉर्म नसेल तर तो निर्माण करणे आवश्यक आहे व या कुटुंबीयांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. फेसबुकवर आक्रमकतेचा बाजार मांडणाऱ्यांनी आपली ताकद या फोरमकरता द्यावी. डॉक्टरने घोषित करावे मी उपचार मोफत करीन. वकिलाने घोषित करावे मी फी घेणार नाही. शाळांनी-कॉलेजांनी घोषित करावे, की आम्ही मोफत शिकवू. विविध दुकानदारांनी घोषित करावे, की आम्ही ना नफा ना तोटा असे सामान देऊ.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे
तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हाऊस पारोला रोड, धुळे




# मना सज्जना...

## जीवा कर्मयोगे जरी जन्म झाला...



एखादा विषय हाताळला जातो तसे यात मृत्यूविषयक गहन चिंतन आहे. हे जणू समर्थांचे लिखित 'मृत्यूपनिषद' म्हणायला हरकत नाही. या श्लोकांचे अर्थ आपण उलगडण्याचा प्रयत्न करूया.

जीवा कर्मयोगे जरी जन्म झाला ।
परी सेवटी काळमुखे निमाला ।
महा थोर ते मृत्युपंथेची गेले ।
किती एक जन्मले आणि मेले ॥१४॥

परम स्नेही मित्रहो,
मागील श्लोकात आपण 'बळे लागला काळ हा पाठी लागी' ही मृत्युरूपी काळाची अटळ क्रिया आपण पाहिली. आता मृत्यू संबंधित समर्थांचे हे काही श्लोक आपल्याला मनुष्य जीवनाच्या अटळ वास्तवाचे दर्शन घडवितात. मृत्यू हा तसा टाळला जाणारा विषय. सहसा यावर बोलायला कुणालाही आवडत नाही. परंतु समर्थ या विषयाची चर्चा भीती न दाखविता मृत्यू म्हणजे मुक्तीचा मार्ग कसा? ते समजावण्याचा प्रयत्न करतात. उपनिषदात ज्या तपशीलवाराने

या श्लोकाचा सरळसरळ अर्थ बघूया. मानवी जन्म हा केवळ सत्कर्माची उपलब्धी आहे. सत्कर्माचे फळ म्हणून ८४ लक्ष योनीतील मानव योनीत आपला जन्म झालेला असतो. जन्मासोबतच मृत्यू पाठी लागलेला असतो, हे अटळ सत्य आहे. जीवनात या अटळ सत्यापासून कुणाचीही सुटका नाही. लहान-थोर, श्रीमंत-गरीब, योद्धा अथवा दुबळा व्यक्ती असे कुणीही यातून सुटलेले नाहीत. सर्वांना या मृत्यूपंथाची वाट चालावी लागणार आहे. हा सृष्टीचा नियम आहे.

समर्थांनी दासबोधाच्या तिसऱ्या दशकातील नवव्या समासात मृत्यूविषयक चिंतन मांडले आहे. त्यात ते मृत्यूची अपरिहार्यता समजावणीच्या सुरात सांगतात. परंतु भीती घालत नाहीत.

संसार म्हणजे सर्वे स्वार ।
नाही मरणास उधार ।
मापी लागले शरीर । घडी ने घडी ।
नित्य काळाची संगती ।
न कळे होणाराची गती ।
कर्मासारखे प्राणी पडती ।
नाना देसी विदेसी ।
सरता संचिताचे शेष ।
नाही क्षणाचा अवकाश ।
भरता न भरता निमीष्य । जाणे लागे ।

घडीघडीने काळ आपल्या आयुष्याची मापे मोजत असतो. प्रत्यक्षात आपण यापासून अनभिज्ञ असतो. परंतु संचिताचे बळ कमी झाले की काळ मृत्यू बनून झडप घालतो. क्षणाचाही वेळ सावरायला मिळत नाही. डोळ्याची पापणी लवते न लवते इतक्या काळात जावे लागते. इथे मृत्यू कसलाही भेदभाव करत नाही. त्याच्या लेखी सर्वत्र जीव हे समान आहेत.

समर्थ म्हणतात–
मृत्यू न म्हणे हा बलाढ्य ।
मृत्यू न म्हणे हा धनाढ्य ।
मृत्यू न म्हणे आढ्य । सर्व गुणे ।
मृत्यू न म्हणे हा विख्यात ।
मृत्यू न म्हणे हा श्रीमंत ।
मृत्यू न म्हणे हा अद्‌भुत । पराक्रमी ।

मृत्यू कोणताही भेद करीत नाही. त्यामुळे त्याचे अटळपण समजून घेऊन जीवन सत्कर्याला लावणे हेच श्रेयस्कर नाही का?

मना पाहता सत्य हे मृत्यू भूमि ।
जिता बोलती सर्वही जीव मी मी ।
चिरंजीव हे सर्व ही मानिताती ।
अकस्मात सांडूनीया सर्व जाती ॥१५॥

तसे पाहिले तर या पृथ्वीतलावरील सर्व सजीवांना जन्म मृत्यूच्या या फेऱ्यातून जाणे अटळ आहे. त्यामुळे मृत्यू हेच अंतिम सत्य आहे. एका अर्थाने ही मृत्यू भूमीच आहे. परंतु मानव मात्र या साऱ्या गोष्टी विसरून जातो. जीवंतपणी मृत्यूची आठवण विसरून मनुष्यप्राणी मी-मीच्या भोवऱ्यात फिरत राहतो आणि या प्रवासात तो स्वतःला चिरंजीव म्हणजे मृत्यूवर विजय मिळविलेला असे समजून कार्य करीत राहतो. ही एकप्रकारे त्याने स्वतःची केलेली सूक्ष्म फसवणूक असते. परंतु जेव्हा निर्वाणीची वेळ येते तेव्हा मात्र आकस्मिक सारे काही सोडून जाणे अपरिहार्य ठरते.

समर्थ म्हणतात, की या साऱ्या गोष्टींचा स्वीकार करावा. यातील अपरिहार्यता समजून घ्यावी. म्हणजे जीवन कसे जगावे? याचे आकलन होते. जीवनाचे सार्थक कसे होईल? यासाठी संत संगती धरून वाटचाल करता येते. मृत्यूच्या या भयकारक चिंतनानंतर कोणत्याही जीवाला भीती वाटणे स्वाभाविक आहे. म्हणून समर्थ दिलासा देत आश्वासित करतात.

श्रोती कोप न करावा ।
हा मृत्यूलोक सकळास ठावा ।
उपजला प्राणी जाईल बरवा । मृत्युपंथे ।
असे जाणोनिया जीवे ।
याचे सार्थकचि करावे ।
जनी मरोनी उरवावे । कीर्तीरूपे ।
असो, ऐसे सकळहि गेले ।
परंतु एकची राहिले ।
जे स्वरूपाकार झाले । आत्मज्ञानी ।

या इहलोकात कीर्तीरूपाने आपली आठवण ठेवता येते. परंतु त्यासाठी भगवंताचे सतत नामस्मरण करून त्याच्याशी एकरूपता साधता येते. ज्यांना हे आत्मज्ञान प्राप्त होते ते स्वरूपाकार होतात आणि जीवन मुक्तही होतात.

जय जय रघुवीर समर्थ!

**– भाऊसाहेब देशमुख, अमळनेर.**
**मो. : 94203 89541**



## श्री संत साईबाबांची उदी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

श्री साईबाबांच्या चरित्रात दोन गोष्टींना फार महत्त्व आहे. पहिली गोष्ट म्हणजे उदी आणि दुसरी गोष्ट दक्षिणा. पण या दोन्ही गोष्टी फार सूचक आणि आपल्या जीवनाशी निगडीत आहेत. बाबांच्या उदीमध्ये सखोल तत्त्वज्ञान भरलेले आहे ज्यामध्ये उदी ही विवेकाची खूण आहे, तर दक्षिणा ही वैराग्याची खूण आहे. विवेकाशिवाय वैराग्य निरर्थक असते म्हणून बाबांनी विवेक आणि वैराग्याची सांगड घातली. उदी म्हणजे बाबांच्या धुनीतील राख. ती राख भक्तांना देऊन बाबा जणू हेच शिकवतात की ज्या देहाचे तू आता पालनपोषण करीत आहेस व एवढे प्रेम करतोस त्या देहाची शेवटी उदीसारखी चिमूटभर राख होणार आहे.

या जगात तर कोणी कोणाचे नाही. आपण या जगात एकटे आलो आणि शेवटी एकटेच जाणार आहोत. आपल्या सोबत या जगातील काहीच येणार नाही हे कठोर सत्य आहे. म्हणून आपण सर्वांनी आपल्या मनात असा विवेक करून आजपासूनच परमार्थ मार्गास लागायला हवे. अहो आपल्या जीवनाची नश्वरता म्हणजे ह्या उदीचे द्योतक आहे.या उदीच्या माध्यमातूनच बाबांनी भक्तांचे असाध्य रोग दूर केलेत. एका अन्य प्रसंगात जेव्हा नानासाहेब चांदोरकरांची मुलगी प्रसूती वेदनांनी व्याकुळ झाली होती तेव्हा श्री साईबाबांनी रामगीर गोसाव्याबरोबर त्यांच्या मुलीसाठी उदी व आरती पाठविली. ज्यावेळी ती उदी पाण्यात मिसळून ते पाणी त्यांची मुलगी ते उदीचे पाणी प्याली तेव्हा तिची त्या वेदनेतून मुक्तता झाली. मालेगावच्या एका डॉक्टरांच्या पुतण्याचा हाड्यात्रण बाबांच्या उदीने बरा झाला. पिल्ल्यांचे सात नारू उदीने बरे झाले. एक ना दोन, अशी किती तरी उदाहरणे सांगावीत. आपला देह हा जरी नश्वर असला तरी परमार्थ साधण्यासाठी आपले शरीर हे निरोगी असावयास हवे म्हणून त्यासाठीच या उदीचे महत्त्व आहे. आज ही साई भक्तांमध्ये उदीला खूप महत्त्व आहे. बाबा भक्तांजवळ दक्षिणा मागत. वास्तविक पाहता बाबांना दक्षिणेची आवश्यकताच काय होती हो? बाबांना ना कोणी पोर होत ना कोणी बाळ. एकटा फकीर मशिदीत राहायचा. पण बाबा त्या दक्षिणेचा उपयोग गरिबांसाठी करीत असत. दक्षिणा ही वैराग्याची खूण आहे. दक्षिणा मागून बाबा भक्तांच्या मनातील आसक्ती व लोभ दूर करीत असत. दक्षिणेमागे एक सामाजिक विचारही आहे. समाजातील एकाजवळ खूप पैसा आहे आणि दुसऱ्याजवळ काहीच नाही. त्यामुळे बाबा धनिकाजवळून पैसा घेऊन त्याचा गरिबांसाठी उपयोग करीत. दक्षिणेमुळे दानाची प्रवृत्तीही वाढते. समाजामध्ये आपण एकटे नाही तर इतरही लोक आहेत. त्यांना देऊन मगच आपण खावे. 'तेन त्यक्तेन भुञ्जीथाः' या तत्त्वाचे दक्षिणा हे सुंदर उदाहरण आहे. दक्षिणेमुळे समाजाच्या ऋणातून मुक्त होता येते. श्रीमंतांचा पैसा श्री साईनाथ महाराज हे गरीबांसाठी उपयोगात आणीत. त्यांच्याच आज्ञेने गोपाळराव बुटी व हरिभाऊ साठे या दोन श्रीमंत व्यक्तींनी शिर्डीत वाडे बांधले. त्यामुळे त्या काळात बाबांच्या असंख्य भक्तांची उतरण्याची सोय झाली. बाबा दक्षिणेसाठी जबरदस्ती कधीच जबरदस्ती करीत नसत. बाबांच्या जीवनकाळात काही भक्त असे असायचे की ते अगोदरच असे निश्चित करून येत की बाबांना दक्षिणा द्यायची नाही. अशा भक्तांकडून बाबा कधीच दक्षिणा मागत नसत. बाबांच्या दक्षिणेची रक्कमही ठराविक असे. भगवान म्हणतात, की 'जो माझ्यावर श्रद्धा ठेवून मला शरीराने व मनाने शरण येतो त्याच्या सर्व संकटांचा परिहार करून त्याला मोक्षाचा मार्ग उपलब्ध करून देतो.' खरे पाहता भाग्यात जे लिहिलेले असते तेच घडत असते. आम्ही फकीर फक्त निमित्ताला कारणीभूत असतो. तरीही योगासिद्धीने आणि परमेश्वराचे कृपेने आम्ही काही प्रसंगी थोडया फार प्रमाणात का होईना भाग्यरेखा बदलू शकतो. 'जो माझे नित्य स्मरण करून अनन्य भावाने मला शरण येतो, त्याला अन्न, वस्त्र व निवाऱ्याची कधीही टंचाई पडणार नाही.'

# 'अंग्कोर वाट!' : विश्वातील सर्वांत मोठे एक हिंदू मंदिर!

## भारतापासून ५००० किलोमीटर दूर देशातील एक हिंदू मंदिर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजमितीसही 'अंग्कोर वाट' जगातील सर्वांत मोठे प्रार्थनास्थळ आहे. जगात कुठल्याही धर्माचे एवढे मोठे प्रार्थनास्थळ नाही. एवढे अवाढव्य प्रार्थनास्थळ त्यापूर्वी ना कोणी बांधले होते, ना कोणी नंतर बांधू शकला. एका कंबोडियन हिंदू सम्राटाने हे बांधले होते. १२ व्या शतकात. इसवी सन ११५० च्या सुमारास. मात्र, १५ व्या शतकापासून काही अनाकलनीय कारणाने ते जंगलात लुप्त झाले होते. मंदिरातील बोटावर मोजण्याएवढे बौद्ध भिक्षू आणि मंदिर परीसरात राहणारे काही आदिवासी खेडूत वगळता शेकडो किलोमीटर अंतरात लोकवस्तीही नव्हती.

५०० एकर एवढ्या भव्य क्षेत्रफळावर बांधलेले 'अंग्कोर वाट' मंदिर आहे भगवान विष्णूंचे! पश्चिममुखी असलेले हे मंदिर किती भव्य असावे? मुख्य प्रवेशद्वारापासून गाभाऱ्यापर्यंत पोहोचायलाच ३ ते ४ किलोमीटर चालावे लागते. मंदिराच्या सभोवती एक आयताकृती कालवा आहे, त्याचीच एकत्रित लांबी ५.५ किलोमीटर आहे. ४ मीटर खोल असलेल्या या कालव्याची रुंदी आहे २५० मीटर म्हणजे पाव किलोमीटर. हा कालवा ओलांडूनच मंदिराच्या पहिल्या प्रवेशद्वारापाशी पोहोचता येते. फक्त पहिल्या प्रवेशद्वारापाशी, मंदिरात नाही. पुढे अशी अजून दोन प्रवेशद्वारे ओलांडूनच आपण मुख्य मंदिराजवळ येतो. तत्कालीन कंबोडियन हिंदू राजा (दुसऱ्या) सूर्यवर्मनने हे भव्यदिव्य मंदिर घडवले, तेव्हा कालांतराने ही वास्तू जगातील सात आश्चर्यांपैकी मानली जाईल, असे त्याला वाटलेही नसेल. 'अंग्कोर वाट'पेक्षा आकाराने निम्म्या वा त्याहूनही छोटे असणाऱ्या युरोपातील 'कॅथेड्रल्स' बांधायला १५० ते २०० वर्षे लागली, काहींना ३००. दुसऱ्या सूर्यवर्मनने हे मंदिर घडवले ते फक्त ३० ते ३५ वर्षांत. लाखो कंबोडियन नागरिक, कामगार, कारागीर, मूर्तीकार, निष्णात अभियंते, वास्तूरचनाकार, शेकडो हत्ती, हजारो



बैलगाड्या, तराफे या मंदिरासाठी ३५ वर्षे अविरत झटत होते. ४८ लाख टनांपेक्षा जास्त दगड लागले, ही वास्तू पूर्ण करण्यासाठी. बरे हा दगडही मंदिराच्या जवळपास उपलब्ध नव्हता. तो आणावा लागला दूर असलेला महेंद्र नामक पर्वत फोडून. रस्तामार्गे हे जड दगड वाहाणे अशक्य होते. नदीतून आणावे म्हटले तर अशी नदीही या बांधकाम स्थानापासून दूर होती. अंतर जवळपास ८०-९० किलोमीटर होत होते. एवढे वजनदार आणि एवढ्या संख्येने दगड वाहून आणने, महाकठीण काम. दुसऱ्या सूर्यवर्मनकडे या अवाढव्य महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी लागणाऱ्या सगळ्या गोष्टी होत्या. वैभवशाली राज्य असल्याने पैशांचा तर महापूर होता, नव्हता तो फक्त वेळ. त्याला त्याच्या जीवनकालातील हे मंदिर पूर्ण करायचे होते. मग या राजाच्या बुद्धिमान अभियंत्यांनी महेंद्र पर्वतापासून मंदिराच्या स्थानापर्यंत महाप्रचंड असे कालव्यांचे जाळे उभारले.

### सारेच अवाढव्य!

डोंगरातून कापलेले दगड तराफ्याने कालव्यांमार्गे बांधकामाच्या ठिकाणी आणले जायचे, तिथे त्यांना जरूरीप्रमाणे कापले जायचे. एकमेकांवर घासून हे कठीण दगड चारही बाजूने सपाट केले जायचे आणि मग बांधकामात वापरले जायचे. दगडाचे असे किती तुकडे एकूण बांधकामासाठी लागले, याची मोजदाद अशक्य.

या साऱ्या बांधकामासाठी ना सिमेंट, ना काँक्रीट ना लोखंड. सगळे बांधकाम दगडावर दगड रचून साकारायचे म्हणजे अतिशय कठीण आणि जोखमीचे काम. आतमध्ये दगडी भित्तिचित्रे असलेल्या दोन-दोन किलोमीटर लांब दगडी 'गॅलरीज' आहेत (यांचे छप्परसुद्धा दगडाचेच). त्यांना आधार द्यायला जे असंख्य खांब आहेत, ते सगळे इतके काटेकोरपणे सरळ रांगेत की तसूभरही फरक नाही. एक मिलिमीटर सुद्धा मागे पुढे नाही. आजकालच्या 'लेझर' किरणांच्या तोडीस तोड तंत्रज्ञान. बांधकामातील कौशल्य अचंबित करते. अतिशय अवघड असे हे तंत्रज्ञान. या तंत्रज्ञानाविषयी फारशी माहिती आता उपलब्ध नाही, पण हे लोक फारच प्रगत तंत्रज्ञान वापरत होते, यात शंकाच नाही. अशा ३ गॅलरीज आहेत. या ज्या लांबलचक गॅलरीज आहेत त्यांनी संपूर्ण मंदिराला विळखा घातलाय. २५० मीटरचा कालवा ओलांडून आले, की एक प्रवेशद्वार. ते ओलांडून एक-दीड किलोमीटर पार केल्यावर दुसरे प्रवेशद्वार. हे प्रवेशद्वार पहिल्या आयताकृती महाप्रचंड गॅलरीचा भाग आहे. ते पार करून थोड्या उंचावर दुसरी आयताकार गॅलरी सुरू होते. ती पार करून मग तिसरी आणि मग मुख्य मंदिराची सुरूवात. या सगळ्या गॅलरीज एकापेक्षा एक उंचावर आहेत. एका पिरॅमिडसारखी रचना. सगळ्यात वर मंदिराचे आभाळात घुसलेले ५ कळस. एक मुख्य कळस मध्यभागी आणि चार उपदिशांना उंचीने थोडे कमी असलेले चार कळस. सुरूवातीला ओलांडून यायच्या कालव्यापासून उंची मोजली, तर मुख्य कळसाची उंची २३३ मीटर आहे. म्हणजेज ७०-८० मजली उंच इमारती एवढी. हे मंदिर पूर्ण झाले आणि आजूबाजूला लोकवस्ती झाली, तेव्हा लंडनची लोकसंख्या होती ३०,००० आणि 'अंग्कोर'ची लोकसंख्या होती दहा लाख. युरोपात औद्योगिक क्रांती होण्याअगोदरचे जगातील सर्वांत मोठे शहर. बांधकामाच्या कलेत आणि शास्त्रात प्रावीण्य असलेले, हिंदू संस्कृतीचा अभिमान बाळगणारे, एक सुसंस्कृत शहर. ( हे भरभराटीला आलेले शहर, मंदिर पुढच्या दोन-तीनशे वर्षांत, ओसाड पडेल, असे तेव्हा कोणाला स्वप्नातही वाटले नसेल.) आजही भल्या-भल्या अभियंत्यांना तोंडात बोटे घालायला लावणाऱ्या या मंदिराची रचना, बांधणी त्याकाळी कशी केली असेल या विचाराने थक्क होते.

### अविश्वसनीय आणि अतर्क्य!

ही सगळी भित्तिचित्रे बघायची म्हटली तर चार-पाच किलोमीटरची पायपीट आलीच. हे सारे कोरीवकाम दगडी भिंतीवर तीन ते चार इंच खोलीत. हे कोरणे तर अवघडच, पण असा एवढा मोठा 'कॅनव्हास' तयार करणेही सोपे नव्हते. एकावर एक अशा दहा-बारा शिळा चढवून भिंत बनवलेली. दोन दगडांमध्ये हवासुद्धा जाऊ नये इतके एकमेकांवर घासायचे, नंतर पूर्ण भिंत नाजूक छिन्नी-हातोड्याने एकसंध बनवायची आणि मूर्तिकारांच्या सुपूर्द करायची. मग या कलाकारांचे कोरायचे काम सुरू. भित्तिचित्रे कोरताना एखाद्यावेळी हातोडा जोरात पडला, एखादी चूक झालीच, तर संपूर्ण भिंतच परत रचायची. परत सपाट करायची आणि परत पहिल्यापासून कोरायला सुरूवात करायची. असे अवाढव्य मंदिर बांधायची कल्पना करणे, असंख्य अडचणींवर मात करून ती कल्पना प्रत्यक्षात आणने, हे सारेच अफलातून.

# तुलसीदासांना दर्शन घडलेले काशीचे 'संकट मोचन हनुमान मंदिर'

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



गोस्वामी तुलसीदास जेव्हा काशीत वास्तव्यास होते, तेव्हा ते तुलसी घाटावर राहत असत. त्यांच्या नावावरूनच त्या गंगा घाटाला 'तुलसी' हे नाव दिले आहे. त्यांनी आपल्या काशी वास्तव्यात कधीही नैसर्गिक विधी काशीत केले नाहीत. मलमूत्र विसर्जन करण्यासाठी ते नावेने गंगा पार करून पलीकडे जात आणि विधी उरकून परत येत.

एकदा असेच तुलसीदास नैसर्गिक विधी उरकून परत जात असताना तिथे एक प्रेत प्रकट झाले आणि म्हणाले की मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे, तुझी इच्छा सांग. तेव्हा तुलसीदास म्हणाले, की पण मी तुला कधी प्रसन्न करून घेतले ? त्यावर ते प्रेत म्हणाले, मी अपवित्र पाण्यावर जगतो. तुम्ही तुमचे विधी झाल्यावर उरलेले पाणी या बाभळीच्या झाडाला टाकता, त्या पाण्यावरच मी जगत आलो आहे आणि आता तुमच्यावर प्रसन्न झालो आहे. यावर तुलसीदास म्हणाले, की ठीक आहे, पण माझी कुठलीच इच्छा नाही, मला फक्त प्रभू श्रीरामचंद्र यांचे दर्शन घ्यायचे आहे. यावर ते प्रेत म्हणाले, की हे सामर्थ्य माझ्यात नाही, पण हे दर्शन तुम्हाला कसे घडू शकेल हे मी सांगू शकतो. तुम्ही रोज रामकथा करता. तुमच्या कथेला दररोज हनुमानजी येतात. हनुमानजींचे पाय धरा. तुम्हाला प्रभू श्रीरामचंद्रांचे दर्शन घडेल. त्यावर तुलसीदास म्हणाले, की मी कसा




हनुमानजींना ओळखणार? यावर ते प्रेत म्हणाले, की कथेला सर्वांत पहिल्यांदा हनुमानजी येतात. अगदी शांत बसून राहतात. अतिशय मळके कपडे घालून येतात आणि जेव्हा कथा संपते तेव्हा तिथलीच माती कपाळाला लावतात आणि जातात. यावरून तुम्ही मारुतीरायांना बरोबर ओळखू शकाल. तुलसीदास यांनी पुढच्या कथेला बघितले की मळके कपडे घातलेला एक वृद्ध सर्वांत आधी कथेसाठी येऊन बसला. कथा झाल्यावर सगळे निघून गेल्यावर तो उठला आणि तिथलीच माती कपाळाला लावून तो तिथून जाऊ लागला. हे बघताच तुलसीदास आनंदी झाले आणि त्या वृद्धाच्या मागे जाऊ लागले. "प्रभू आता तरी थांबा..." करीत तुलसीदास त्या वृद्धाचा पाठलाग करू लागले. पुढे तो वृद्ध आणि मागे तुलसीदास. इकडे वृद्धाने आपल्या चालण्याचा वेग वाढवला, तिकडे तुलसीदासांनीही वेग वाढवला. आपल्या मागे तुलसीदास येत आहे आणि त्याने आपल्याला ओळखले आहे हे हनुमंतजींना समजले होते. तुलसीदास यांना टाळण्यासाठी हनुमानजी जंगलात शिरले. पण आता मात्र हनुमानजी आणि तुलसीदास यांच्यातील अंतर वाढले. तुलसीदास यांच्या हनुमानजींना थांबविण्यासाठी मारलेल्या हाकांचा आवाज क्षीण होत गेला. म्हणता-म्हणता हनुमानजी जंगलाच्या मध्य भागात आले आणि तेवढ्यात तुलसीदास यांनी येऊन त्या वृद्धाचे पाय धरले. तुलसीदास म्हणाले, की प्रभू थांबा. मारुतीराया माझ्यावर दया करा. मला प्रभू श्रीरामचंद्र यांचे दर्शन द्या.

मारुतीरायांनी एका झटक्यात तुलसीदास यांचे हात आपल्या पायापासून दूर केले आणि म्हणाले, की मी मारुती नाही. माझी वाट अडवू नकोस. मला जाऊ देत. तुलसीदासांनी परत त्यांचे पाय धरले आणि म्हणाले, की मी तुम्हाला ओळखले आहे. तुम्ही जोपर्यंत माझी इच्छा पूर्ण करीत नाही तोपर्यंत मी तुमचे पाय सोडणार नाही. प्रभू मला तुमचे प्रत्यक्ष दर्शन द्या.

तुलसीदास विनवण्या करीत राहिले. शेवटी हनुमानजींनी तुलसीदास यांना त्यांचे प्रत्यक्ष दर्शन दिले. ज्या ठिकाणी तुलसीदास यांना हनुमानजींचे हे दर्शन घडले, तिथेच आज काशीचे अतिशय प्रसिद्ध 'संकट मोचन हनुमान मंदिर' आहे. या मंदिरात हनुमानजींचे प्रत्यक्ष चैतन्य जाणवते.

हनुमानजी पुढे म्हणाले, की तुला जर प्रभू श्रीरामचंद्र यांचे दर्शन घ्यायचे असेल तर तुला चित्रकूट येथे जायला हवे. तिथे स्वामी नित्य येतात. तिकडे गेल्यावर तुला अतिशय सुंदर अशा दोन सुकुमारांचे दर्शन घडेल. तुलसीदास चित्रकूट येथे गेले. तिथे प्रभू श्रीरामचंद्र भक्तीत लीन झाले. एकदा ते चित्रकूट परिक्रमा करीत असताना त्यांना घोड्यांवर स्वार झालेले अतिशय सुंदर असे धनुष्यबाण घेतलेले दोन तरुण दिसले. त्या दोघांना बघून तुलसीदास त्यांच्यावर असे मोहून गेले, की ते त्या दोघांना ओळखू शकले नाहीत. ते दोघे जसे आले तसेच तुलसीदास यांच्या जवळून निघून गेले. तेवढ्यात तिथे हनुमानजी आले आणि म्हणाले, की प्रभू त्यांच्या धाकट्या भावाबरोबर येथे आले होते. तुला भान राहिले नाही, पण हरकत नाही. उद्या सकाळी परत एकदा तुला प्रभूंचे दर्शन घडेल.

दुसऱ्या दिवशी मौनी अमावास्या होती. तुलसीदास रामघाटावर आसनस्थ होऊन प्रभू श्रीरामचंद्र यांची वाट बघू लागले. तेवढ्यात तिथे एक छोटा मुलगा आला आणि म्हणाला, की बाबा, मला चंदन हवे आहे. तुम्ही द्याल का मला चंदन? त्या लहान मुलाच्या मोहक मुखाकडे तुलसीदास बघतच राहिले.

तुलसीदासांचे भान हरपले आहे, हे हनुमानजींनी जाणले आणि म्हणून हनुमानजींनी एका पोपटाचे रूप धारण केले आणि म्हणाले,
"चित्रकूट के घाट पर, भई संतन की भीर,
तुलसीदास चंदन घिसे, तिलक करे रघुवीर ॥"

हे ऐकताच तुलसीदास लगेच भानावर आले. त्यांनी प्रभू श्रीरामचंद्र यांना ओळखले. तेव्हा रामजी त्यांच्या प्रत्यक्ष रुपात आले, तुलसीदास यांनी प्रभू श्रीरामचंद्र यांना चंदनाचा टिळा लावला, प्रभू श्रीरामचंद्र यांनीही तुलसीदास यांना चंदनाचा टिळा लावला आणि मग प्रभू श्रीरामचंद्र तिथून अंतर्धान पावले.

**॥ श्रीराम जय राम जय जय राम ॥**

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**